CNR NO.MHSO060002142026

**नियमित दिवाणी दावा क्र.२२/२०२६**

रावसाहेब वगरे

**विरुध्द**

महाराष्ट्र शासन, वगैरे

## निशाणी क्र.५६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी वादपत्र रद्द करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे दाखल केलेला आहे. प्रतिवादींच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-

०२. प्रतिवादींचे कथन आहे की, यापूर्वीचा त्यांचा वादपत्र रद्द करण्याचा अर्ज नामंजूर करण्यात आलेला आहे. दावा दाखल करतेवेळी वादीने कथन केले की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी मुळ गट क्र.७६ चे केलेले भूसंपादन व त्यानंतर केलेले वाटप यामध्ये मोठी अनियमितता झालेली असुन, बोगस कागदपत्रे तयार झालेली आहेत. त्याआधारे खरेदीखत झालेले आहे. करीता, सदरील कागदपत्रे चुकीची व बेकायदेशीर, रद्दबातल आहेत अशी घोषणा वादी मागत आहे. तसेच बाळकू पवार व दिगंबर दवण यांनी मिळविलेल्या परवानग्या बेकायदेशीर असुन, त्याआधारे या प्रतिवादींना करुन दिलेली खरेदीखते बेकायदेशीर व रद्दबातल आहेत अशी घोषणा वादीने मागितलेली आहे. सदरील बाबी या मा. न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येत नाहीत. त्यास महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ कलम २४ ची बाधा येते त्यामुळे वादपत्र खारिज होण्यास पात्र आहे. करीता, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे वादपत्र खारिज (Reject) करण्यात यावे.

०३. प्रतिवादींचे कथन आहे की, प्रतिवादींची खरेदीखते रद्दबातल आहेत अशी घोषणा वादीने मागितलेली आहे, त्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येते. तसेच वादीने पुर्वी नियमित दिवाणी दावा क्र.५३/२००३ दाखल केला होता तो खारिज

झालेला आहे. तरी देखील खोटे व काल्पनीक कथन करुन प्रस्तुतचा दावा दाखल केल्याने दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २ नियम २ ची बाधा येत असल्याने दावा नामंजूर करण्यात यावा.

०४. वादीने सदरील अर्जास त्याचे म्हणणे (निशाणी क्र.५८) दाखल केले. वादीने कथन केले की, यापूर्वी प्रतिवादींचा वादपत्र खारिज करण्याचा अर्ज नामंजूर झालेला आहे. तरी प्रकरण लांबविण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दाखल केलेला असुन, तो कायद्याने चालणारा नाही. अर्ज कायदेशीर नसल्याने नामंजूर करण्यात यावा. वादी अर्ज नामंजूर करण्याची विनंती करतो.

०५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझे विचारार्थ असून, त्यावरील निष्कर्ष मी त्याखाली नोंदविलेल्या कारणांसाठी देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ कलम २४ नुसार दावा या न्यायालयात चालण्यास बाधा येते काय ? व त्यामुळे वादपत्र नामंजूर/रद्द होण्यास पात्र आहे काय ? | .... | **वादीने मागितलेली दिवाणी स्वरुपाची दाद पाहता, नकारार्थी** |
| २. | काय आदेश ? | .... | **अर्ज नामंजूर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता –**

०६. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील कलम २४ येथे महत्वपुर्ण ठरते. कलम २४ नुसार सदरील

अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये जो प्रश्न प्रकल्प प्राधिका-याने, जिल्हाधिका-याने, आयुक्ताने किंवा राज्य शासनाने मिटविणे, निर्णित करणे किंवा हाताळणे आवश्यक असेल असा कोणताही प्रश्न मिटविण्याची, त्यावर निर्णय देण्याची किंवा तो हाताळण्याची अधिकारीता कोणत्याही दिवाणी न्यायालयास असणार नाही असे अंतर्भुत केलेले आहे. म्हणजेच जे प्रश्न या अधिनियमांतर्गत नेमलेल्या शासकीय अधिका-याने निर्णित करावयाचे असतील अथवा हाताळवयाचे असतील असे प्रश्न हाताळण्याची अधिकारीता अथवा त्यावर निर्णय देण्याची अधिकारीता दिवाणी न्यायालयास नसून, या प्रश्नांसंदर्भात बाधा न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रास येते. या अनुषंगाने वादींनी दाव्यात केलेली कथने व मागितलेला अनुतोष विचारात घेणे आवश्यक आहे.

०७. वादीने वादमिळकती संदर्भातील खरेदीखते रद्दबातल असुन, वादीवर बंधनकारक नाही अशी घोषणा दाव्यात मागितलेली आहे. वादीने दाखल केलेली कागदपत्रे (निशाणी क्र.४ यादीप्रमाणे) पाहता प्रथमदर्शनी असे दिसते की, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, सोलापूर आदेश क्र./पुनर्वसन/३/सातारा/आरआर/११८५/२०२३ दि.१३.०६.२०२४ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने प्रस्तुतचा दावा वादीने दाखल केलेला आहे. तसेच शासनाने सन १९७४ साली भूसंपादन करुन मिळकत ताब्यात घेताना केलेला कब्जेपावती पंचनामा यावर वादीचा भर त्याने आव्हानित केलेल्या खरेदीखताच्या अनुषंगाने आहे. दाव्याचे स्वरुप पाहता वादमिळकतीचे खरेदीखत रद्दबातल असल्याची घोषणा मिळण्यास वादी पात्र आहे अथवा नाही हे पुराव्याअंती ठरणार आहे. वादीने पुर्वीच्या दाव्यात कुलमुखत्यार म्हणुन काम पाहिलेले असुन, त्या दाव्यातील निकालाचा परिणाम या दाव्यावर काय होतो हे देखील न्यायनिर्णयाच्या वेळेस पाहणे दाव्याचे स्वरुप पाहता योग्य ठरते. प्रतिवादींनी महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तीचे पुर्नवसन अधिनियम, १९९९ कलम २४ चा आधार घेवुन वादपत्र रद्द करणेबाबत विनंती केली आहे. याबाबत विवेचन करणे आवश्यक ठरते.

०८. महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ कलम २४ नुसार जे प्रश्न महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ अंतर्गत संबंधीत अधिका–यांनी हाताळणे अथवा निर्णित करणे आवश्यक आहेत ते प्रश्न दिवाणी न्यायालयास हाताळण्याचा अधिकार नाही. कलम २४ नुसार अधिकारक्षेत्रास बाधा येते. याच अनुषंगाने वादीने मागितलेला अनुतोष विचारात घेणे आवश्यक आहे.

०९. वादीने त्याच्या दिवाणी हक्काबाबत दाद मागितलेली असून, वादी मागत असलेल्या प्रतिवादी क्र.७ व ८ विरुध्दच्या घोषणेच्या अनुषंगाने सदरील दाद मंजूर होण्यास तो पात्र आहे अथवा नाही हे पुराव्याअंती ठरणार आहे. त्यामुळे दाव्यातील वादीची कथने व वादी मागत असलेला अनुतोष पाहता, महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९९९, कलम २४ येथे लागू पडत नाही.

१०. पुर्वीच उल्लेखल्याप्रमाणे दाव्यातील वादीची कथने व वादी मागत असलेला घोषणेचा अनुतोष पाहता, वादीने त्याच्या दिवाणी हक्काबाबत दाद मागितल्याचे स्पष्ट होते. वादी मागत असलेली दाद प्रतिवादी क.७ व ८ विरुध्द घोषणेच्या अनुषंगाने मंजूर होण्यास पात्र आहे अथवा नाही ? हे पुराव्याअंती ठरणार आहे. त्यामुळे या दाव्यातील परिस्थिती पाहता, वादपत्र खारिज करण्याचे कारण नाही. मुदतीचा मुद्दा तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११ व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २ नियम २ चा मुद्दा देखील अंतिम निकालाच्या वेळेस विचारात घेणे आवश्यक ठरणार असल्याने वादपत्र खारिज होण्यास पात्र ठरत नाही. करीता, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> –**

११. उपरोक्त मुद्दा क्र. १ वर नोंदविलेल्या कारणांवरुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(खुल्या न्यायालयात घोषीत.)

NILESH SUBHASH BUDRUK Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK Date: 2026.04.04 15:41:18 +0530

दि. ०३.०४.२०२६

( नीलेश सु. बुद्रुक )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
पंढरपूर

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 04.04.2026 |
| (d) | Uploaded on | : | 04.04.2026 |